मंत्रालयीन विभागांबाहेरील राजपत्रित वर्ग १[कनिष्ठ] व वर्ग-२ मधील अधिका-यांना अत्युत्कृष्ट कामाबद्दल आगाऊ वेतनवाढी मंजूर करण्याचे प्राधिकार मंत्रालयीन विभाग सचिवांना प्रदान करण्याबाबत.....

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय, क्रमांक: एसआरव्ही-१०८५/१६१४/के. नं. २५७/आठ,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक ८ एप्रिल, १९८६.

वाचा :- [१] शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:एसआरव्ही-१०६९/ड, दिनांक २६ जून १९७०.
[२] शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : एसआरव्ही-१०७१/ड, दिनांक १४ जानेवारी, १९७२.
[३] शासन निर्णय, व परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: एसआरव्ही-१०७२/ड, दिनांक ११ फेब्रुवारी, १९७४.
[४] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: एसआरव्ही-१०७७/सीएन-१२७/७९/आठ, दिनांक ४ डिसेंबर, १९७९.
[५] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: एसआरव्ही-१०८०/१३३३-सीएन-११८/आठ, दिनांक २४ सप्टेंबर, १९८०.
[६] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: एसआरव्ही-१०८१/१४३३/सीएन-११९/आठ, दिनांक २४ डिसेंबर, १९८१.
[७] शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: एसआरव्ही-१०८३/सीएन-१६/आठ, दिनांक ६ सप्टेंबर, १९८३.
[८] शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: एसआरव्ही-१०८४-के. नं. ६/आठ, दिनांक १९ फेब्रुवारी, १९८४.

शासन निर्णय :- राजपत्रित अधिका-यांना अत्युत्कृष्ट कामाप्रीत्यर्थ आगाऊ वेतनवाढी देण्याच्या प्रस्तावांचे परीक्षण करण्याची सध्याची कार्यपध्दती सुधारण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. शासनाने आता असा निर्णय घेतला आहे की, महाराष्ट्र मंत्रालय सेवेतील अधिका-यांव्यतिरिक्त वर्ग-१ व वर्ग-२ च्या ज्या अन्य अधिका-यांच्या वेतनश्रेणीचा उच्चतम टप्पा रुपये १५००/- पेक्षा जास्त नाही, अशा राजपत्रित अधिका-यांना आगाऊ वेतनवाढी मंजूर करण्याचे प्राधिकार मंत्रालयातील संबंधित प्रशासकीय विभागांच्या सचिवांना, प्रस्तावनेत नमूद केलेल्या आदेशातील अटींच्या अधीन राहून प्रदान करण्यात यावेत.

२. मंत्रालयीन विभागांनी, त्यांच्या नियंत्रणाखालील कार्यालयातील, राजपत्रित अधिका-यांच्या प्रस्तावांचा विचार करण्यासाठी, ३ सह सचिव/उप सचिवांची एक समिती स्थापन करावी. एखाद्या विभागामध्ये ३ सह/उप सचिव नसल्यास, अशा विभागाने अन्य विभागांतील उप सचिव आपल्या समितीवर घ्यावेत. या समितीच्या शिफारशीवर, संबंधित प्रशासकीय विभागांच्या सचिवांनी निर्णय घ्यावा.

३. शासनाच्या उपरोक्त निर्णयानुसार सर्व मंत्रालयीन विभागांना विनंती करण्यात येते की, त्यांनी, त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील कार्यालयातील राजपत्रित

शाखा - EST 19/5/86

अधिका-यांना अत्युत्कृष्ट कामानिमित्त आगाऊ वेतनवाढी मंजूर करण्याची योजना योग्य प्रकारे राबविण्याकरिता, प्रस्तावनेत निर्देशिलेल्या आदेशान्वये वेळोवेळी विहित करण्यात आलेल्या व यापुढे विहित करण्यात येणा-या अटींची व शर्तींची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

४. सन १९८५ सालासाठी [१-१०-१९८५ पासून], मंत्रालयाबाहेरील राजपत्रित अधिका-यांना, आगाऊ वेतनवाढी मंजूर करण्यासाठी, सामान्य प्रशासन विभागाकडे पाठविलेले प्रस्ताव, संबंधित प्रशासकीय विभागांना परत करण्यात यावेत. संबंधित प्रशासकीय विभागांनी, सदर प्रस्ताव, परिच्छेद २ प्रमाणे स्थापन करण्यात येणा-या नवीन समितीपुढे ठेवावे व समितीच्या शिफारशीवर संबंधित सचिवांनी निर्णय घ्यावा व त्यास शासनाची मान्यता मिळवावी.

५. शासनाने असाही निर्णय घेतला आहे की, महाराष्ट्र मंत्रालय सेवेतील राजपत्रित अधिका-यांची प्रकरणे सामान्य प्रशासन विभागामध्ये विचारात घेतली जावीत. त्यासाठी, सामान्य प्रशासन विभागातील विद्यमान विषेश समिती ऐवजी, ३ सह/उप सचिवांची एक समिती स्थापन करण्यात यावी व त्या समितीकडे अशा राजपत्रित अधिका-यांची प्रकरणे तपासण्याचे काम सोपविण्यात यावे. या समितीच्या शिफारशींवर अपर मुख्य सचिवांनी निर्णय घ्यावा.

६. वरील निर्णयास अनुसरून सर्व मंत्रालयीन विभागांना विनंती करण्यात येते की, महाराष्ट्र मंत्रालय सेवेतील राजपत्रित अधिका-यांचे आगाऊ वेतनवाढीचे प्रस्ताव पूर्वीप्रमाणेच सामान्य प्रशासन विभागाकडे प्रतिवर्षी विहित मुदतीत पाठवावेत.

७. सर्व मंत्रालयीन विभागांना अशीही विनंती करण्यात येते की, शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:एसआरव्ही-१०८१/१२११/सीएन-११०/आठ, दिनांक ४ ऑगस्ट, १९८१ अन्वये, आवश्यक असल्याप्रमाणे आगाऊ वेतनवाढीबाबतचा अहवाल प्रतिवर्षी १ जानेवारीपर्यन्त या विभागास न चुकता पाठवावा.

८. **हे आदेश वित्त विभागाच्या** सहमतीने, त्या विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक: सीआर-१०९२/८५-सेवा-३, दिनांक १८ नोव्हेंबर १९८५ अन्वये निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ग. ज. देशमाने,
उप सचिव,
महाराष्ट्र शासन.

प्रति,